**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

पुणे पोलीस

जावक क्रमांक – पोउपआ/वाह/नियो./ ४९२५ /२०२४ दिनांक :- १२/१२/२०२४

**<u>प्रेसनोट</u>**

पुणे महानगरपालिका प्रकल्प विभागामार्फत शास्त्रीनगर चौक येरवडा येथे ग्रेडसेपरेटर व उड्डाणपुलाचे काम सुरु करण्यात येणार असुन दि. १२/१२/२०२४ ते दि. १६/१२/२०२४ रोजी दरम्यान **शास्त्रीनगर चौक व गोल्फ क्लब चौकाकडे जाणाऱ्या मार्गावर एकुण ०६ ठिकाणी** सॉईल इन्व्हीस्टीगेशन करणे कामी बोअर होल घेण्यात येणार असल्याने सदरचे काम करताना वाहतूकीस अडथळा अगर काही अनुचित प्रकार होवू नये याकरीता सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन सदर परिसरातील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर शास्त्रीनगर चौक ते गोल्फ क्लब चौकाकडे जाणारा रस्त्यावरील वाहतूकीत खालीलप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात बदल करीत आहे.

**शास्त्रीनगर चौक येरवडा ते गोल्फ क्लब चौकाकडे जाणाऱ्या मार्गावर दि. १२/१२/२०२४ ते दि. १६/१२/२०२४ रोजीच्या कालावधीत रात्रौ २२/०० वा. ते सकाळी ०७/०० वा. दरम्यान खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.**

- शास्त्रीनगर चौक ते गोल्फ क्लब चौक मार्गावरील सर्व प्रकारची **जड-अवजड वाहतुक बंद करण्यात येत असुन** सदर वाहने ही शास्त्रीनगर चौक - गुंजन चौक – पर्णकुटी चौक –- महात्मा गांधी उद्यान चौक - तारकेश्वर चौक डावीकडे वळण घेवुन - सादलबाबा चौक मार्गे इच्छित स्थळी जातील
- शास्त्रीनगर चौक ते गोल्फ क्लब चौकाकडे जाणारी चारचाकी वाहने आवश्यकते नुसार शास्त्रीनगर चौक सरळ गुंजन चौक उजवीकडे वळण घेवुन गोल्फ क्लब चौक मार्गे वळविण्यात येईल.
- शास्त्रीनगर चौकातुन गोल्फ क्लब चौकाकडे जाणारी बाजुस (लुप रोड डावी बाजु) शास्त्रीनगर चौकापासुन २०० मीटर अंतरापर्यंत नो पार्किंग व नो होल्टिंग झोन करण्यात येत आहे.

**(नागरीकांनी नमुद कालावधीत दिलेल्या मार्गाचा वापर करावा तसेच वाहतुक कर्मचारी / स्वयंसेवक यांना सहकार्य करावे.)**

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक पुणे शहर.

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रति,

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- २) **पोलीस आयुक्त सो,** पुणे शहर.

३) **पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.

५) **प्रभारी अधिकारी येरवडा वाहतूक विभाग, पुणे शहर**